# प्रेसनोट

दिनांक:- २५/०७/२०१९

**वाहतुक शाखेतर्फे मराठवाडा मित्रमंडळ कॉलेज ऑफ आर्किटेक्चर पुणे महाविदयालयीन विदयार्थ्यांसाठी "रस्ता सुरक्षा अभियान"कार्यक्रमाचे आयोजन**

पुणे शहराची वाढती लोकसंख्या व त्या पटीने वाढत असलेली वाहनाची संख्या यामुळे पुणे शहरात व आसपास गजबजलेल्या ठिकाणी वाहन अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. याला एक महत्त्वाचे कारण म्हणजे वाहन चालकांचा बेशिस्त व बेदरकारपणा तसेच रस्ते सुरक्षेबाबत अनभिन्नता असने हे होय. पुणे शहरातील व आसपासची वाहतूक व्यवस्था सुरळीत करणे बरोबरच वाहन चालकांना मुख्यत्वेकरुन महाविदयालयीन विदयार्थी यांना रस्ता सुरक्षा संदर्भात तसेच स्वयंम: सुरक्षेसंदर्भात विविध तज्ञ व्यक्ती मार्फत समुपदेशन करुन त्यांना शिस्त लावणे व वाहन अपघाताचे प्रमाण कमी करण्याचा अभिनव उपक्रम पुणे शहर वाहतूक शाखेचे पोलीस उप आयुक्त यांनी सुरु केला आहे. या उपक्रमाचाच एक भाग म्हणून वाहतुक शाखा पुणे शहर व मराठवाडा मित्रमंडळ कॉलेज ऑफ आर्किटेक्चर पुणे राष्ट्रीय सेवा योजना यांचे संयुक्त विदयमाने दिनांक २५/०७/२०१९ रोजी १२.०० ते १४.०० वा. चे दरम्यान महाविदयालयीन विदयार्थ्यांसाठी रस्ता सुरक्षा संदर्भात **"रस्ता सुरक्षा अभियान"** कार्यक्रम संदर्भात १७० वे सत्राचे मराठवाडा मित्रमंडळ कॉलेज ऑफ आर्किटेक्चर पुणे महाविदयालयातील सेमिनार हॉल येथे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमास मा. पंकज देशमुख, पोलीस उप आयुक्त वाहतुक शाखा, श्रीमती सुप्रिया नेने, प्राचार्य, डॉ शुभांगी शिरोळे, उप प्राचार्य, श्रीमती उज्वला पळसुले, ॲडमीन को-ऑरडिनेटर, श्रीमती आरती पाटील, सोशल ॲक्टीव्हिटी को-ऑरडिनेटर, मराठवाडा मित्रमंडळ कॉलेज ऑफ आर्किटेक्चर पुणे, डॉ. प्रवीण पारगांवकर, मानसोपचार तज्ञ, डॉ आनंद कुलकर्णी, मानसोपचार तज्ञ, श्री राजेश पुराणिक, पोलीस निरीक्षक वाहतुक शाखा इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

सदर कार्यक्रम दरम्यान श्रीमती सुप्रिया नेने, प्राचार्य मराठवाडा मित्रमंडळ कॉलेज ऑफ आर्किटेक्चर पुणे यांनी आपले मार्गदर्शनपर भाषणात वाहतुक शाखेचे पोलीस उप आयुक्त श्री पंकज देशमुख पोलीस निरीक्षक राजेश पुराणिक, डॉ. प्रवीण पारगांवकर, मानसोपचार तज्ञ, डॉ आनंद कुलकर्णी, मानसोपचार तज्ञ हे मान्यवर कार्यक्रमास उपस्थित झाले बददल त्यांचे आभार मानुन वाहतुकीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली असुन सर्व विदयार्थ्यांनी वाहतुकीचे नियमाचे पालन करणे हे त्यांच्या भविष्यासाठी कसे हितावह आहे याबाबत मार्गदर्शन करुन प्रत्येकाने वाहतुक नियमाचे पालन करणे बाबत आवाहन केले.

सदर कार्यक्रम दरम्यान मा पंकज देशमुख पोलीस उप आयुक्त वाहतुक शाखा पुणे शहर यांनी उपस्थित मराठवाडा मित्रमंडळ कॉलेज ऑफ आर्किटेक्चर विदयार्थ्यांशी संवाद साधुन वाहतुक समस्येतील ४ मुलभुत तत्व १ एज्युकेशन २ इनफोर्समेंट ३ इंजिनिअरिंग ४ इमरजन्सी सर्व्हिसेस बाबत प्रबोधन करुन विदयार्थ्यांशी प्रश्नमंजुशा घेवून विदयार्थ्यांना प्रश्न विचारुन पुणे शहरातील वाहतुक समस्ये बाबत कारणे विचारले. त्यामध्ये पार्किंग, ओव्हर ब्रिज, वन वे, रिंग रोड, वाहनांची संख्या, अर्बन डेव्हलपमेंट प्लॅन इ. प्रश्नांवर प्रतिक्रिया देतांना या सर्व बाबी वाहतुक पोलीस यांचे अखत्यारित येत नसल्याने या सर्व जबाबदाऱ्या नागरिकांच्या व वाहन चालकांच्या असल्याने प्रत्येक वाहन चालकाने आपली जबाबदारी व कर्तव्ये जाणुन घेवून वाहतुक नियमांचे उल्लंघन न करता वाहन चालवणे आवश्यक असले बाबत सांगीतले. पुढे त्यांनी आपले भाषणात आपन देशाचे भावी आर्किटेक्ट असल्याने आपण वाहतुक समस्या बाबत आम्हास पर्यायी सुचवल्यास ते स्वगतार्ह असतील असे सांगीतले.

(राजेश पुराणिक)
पोलीस निरीक्षक
वाहतूक शाखा, पुणे शहर

श्री राजेश पुराणिक पोलीस निरीक्षक वाहतुक शाखा पुणे शहर यांनी आपले प्रस्तावनापर भाषणात सांगीतले कि, सद्या रस्ता आणि वाहन हा तरुणाईच्या जिवनाचा अविभाज्य घटक झाला आहे. तरुणाईने वाहन अतिशय जबाबदारीने व शिस्तबध्द पध्दतीने वापरणे गरजेचे आहे. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार असा अर्थ न घेता तरुण पिढीने जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. आपल्याला ७० वर्षे स्वातंत्र्य मिळुन ही आपण नियमांचे पालन करीत नसल्याने किंवा अनुशाषीत नसल्याने वाहतुकीचे प्रश्न गंभीर होत चालले असल्याची जाणीव करुन दिली. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ०१ वर्षाने स्वातंत्र्य मिळालेल्या इस्त्राईल या देशाने अनुशासन व तेथील नागरिकांची देशभक्ती यामुळे ते बिकट परिस्थितीवर मात करुन प्रगती पथावर आहेत. आपल्या देशातील नागरिकांमध्ये अनुशासन व देशभक्ती कमी होत चालल्याचे दिसुन येत आहे. वाहतुक नियमांचे पालन करुन देशात दर वर्षी अपघातामध्ये मरण पावणारे १,४७,००० (एक लाख सत्तेचाळीस हजार) ही संख्या नक्की कमी करता येईल असे सांगीतले. तसेच सदरवेळी मा. सर्वोच्च न्यायालयाने सन २०१६ मध्ये पारीत केलेल्या ''गुड सॅमरिटन'' कायद्याबाबत माहिती देवून कायद्यातील तरतुदी प्रमाणे अपघातग्रस्तांना मदत करतांना सद्भावपुर्वक केलेल्या कृत्यांना कायद्याचे संरक्षण असल्याची माहिती करुन दिली. तसेच वाहतूकी संदर्भातील कायदे व त्यातील तरतुदी बाबतचे मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमात मानसरोग तज्ञ डॉ. प्रविण पारगांवकर यांनी पुणे करांची हेल्मेटबाबत मानसिकता कशी आहे, याबाबत वाहनचालकांचे समुपदेशन करताना संवाद साधला त्यावेळी त्यांनी सांगितले की, रोज सकाळी नित्यनियमाने तुम्ही काहीतरी कामानिमित्त घराबाहेर पडतात. यावेळी आपल्या मनात प्रत्येक कामाबद्दल सकारात्मक/नकारात्मक विचार सुरु असतात. अशावेळी रस्ता सुरक्षेच्या नियमांचे पालन न केल्यास गंभीर अपघात होण्याची शक्यता असते. त्यातही मनुष्याच्या मेंदू व्यतिरिक्त अन्य भाग ऑपरेशनव्दारे बदलता येवू शकतात परंतू मेंदू बदलता येत नसल्याने सुरक्षेसाठी हेल्मेट वापरणे गरजेचे आहे. त्यांनी पुढे असे सांगितले की, समाजाकडून बदल अपेक्षित करणाऱ्याच नागरिकांना प्रथम स्वतःमध्ये बदल व शिस्त आत्मसात करणेची गरज असते. पायाभुत सुविधा उदा. रस्ते, पुल सिग्नल, स्पीड ब्रेकर, झेब्रा क्रॉसींग वाहतूक पोलीस वगैरे मध्ये सुधारणा अपेक्षित आहेतच, परंतू त्यासाठी जो कालावधी लागतो त्या दरम्यान प्रत्येक नागरीकांनी आपल्या सुरक्षेची जबाबदारी काही प्रमाणात स्वतः घेणे अपेक्षीत आहे. मनुष्याचे जीवन हे अमुल्य आहे, त्यांतही मेंदू सारखे नाजूक अवयवास इजा झाल्यास त्यात अद्याप तरी सुधारणा करता येत नाही. त्यामुळे दुचाकी चालवताना हेल्मेट परिधान करणे व मोटर कार चालवताना सिट बेल्ट लावणेची शिस्त अंगी बाळगणे बाबत माहिती दिली.

डॉ. आनंद कुलकर्णी मानसरोग तज्ञ यांनी आपल्या सवयी व वर्तन या विषयाला धरुन वाहनचालकांचे हेल्मेट परिधान करणेबाबत मार्गदर्शन व प्रबोधन केले त्यावेळी त्यांनी D GAP ॲब्रीव्हेशन बाबत सांगितले वाहनचालकांनी D म्हणजे Discipline, G म्हणजे Goal, A म्हणजे Attitude व P म्हणजे Plan या गोष्टींचा अवलंब करुन हेल्मेट परिधान करण्याचा संकल्प केला पाहिजे त्यामुळे हेल्मेट परिधान करणे हे स्वतःच्या सुरक्षेसाठी महत्त्वाचे आहे. कारण त्यामुळे अपघात झाल्यास मेंदूला इजा पोहचण्याचे प्रमाण कमी होते. मेंदू हा शरिराचा सर्वात महत्त्वाचा अवयव आहे असे सांगितले.

सदर कार्यक्रमाचे आयोजन पवन गमास्ते, सुत्रसंचालन भक्ती कुलकर्णी व आभार प्रदर्शन कार्तिक कुलकर्णी यांनी केले. व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

सदर **"रस्ता सुरक्षा अभियान"** कार्यक्रमास उपस्थित असलेल्या सर्व विदयार्थ्यांना **"रस्ता सुरक्षा मार्गदर्शिका"** पुस्तकाचे वाटप करण्यात आले. सदरचा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यात आला आहे. सदर कार्यक्रमासाठी सुमारे २५० विदयार्थी उपस्थित होते. त्यांना वाहतुकी संदर्भातील कायदे व त्यातील तरतुदी याबाबत योग्य मार्गदर्शन करण्यात आले आहे.

तसेच मराठवाडा मित्रमंडळ कॉलेज ऑफ आर्किटेक्चर पुणे व वाहतुक शाखा पुणे शहर यांचे संयुक्त विदयमाने सदर महाविदयालयातील एन एस एस, एन सी सी, विदयार्थ्यांसाठी पुढील प्रकल्प राबविण्यात येणार आहेत.

१.पोलीस मित्रमंडळ स्थापन करणे २. विदयापीठ स्तरावर पथनाटय, चित्रकला, ऑलोकेशन कॉम्प्युटेशन, ३. चौक किंवा रस्त्याचे पालकत्व, ४. कॉलेज स्तरावर वाहतुक कमिटी स्थापन करणे. ५. प्रसारमाध्यमे, जिवंत देखावे सादर करणे ६. भिंतीवर वाहतुक चिन्हांचे बोर्ड, झेब्रा क्रॉसिंग व पार्किंग तयार करणे ७. गुड सॅमिरिटन कायदया बाबत जनजागृती, फ्लेक्स तयार करणे व विदयार्थ्यांना गुड सॅमिरिटन पारितोषिक प्रदान करणे.

**(राजेश पुराणिक)**
**पोलीस निरीक्षक**
**वाहतूक शाखा, पुणे शहर**